# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 18/11/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०.५ किमी अंतरावर मौदा जीवन विकास सोसायटी कॉम्प्लेक्स उमरेड येथे दि. १८/११/२०२३ चे २.०० वा. ते ०३.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— श्रीराम विठोबाजी वाघमारे, वय ६० वर्ष, रा. रेल्वे स्टेशन रोड विनय टॉकीज जवळ मंगलवारी पेठ उमरेड ह. मु भिष्मा अपार्टमेंट न्यु सुभेदार ले आउट नागपूर यांचे गिरड रोड उमरेड एसबीआय बॅकेचे आमोरासमोर रोडचे कडेला जिवन विकास सोसायटीचे कॉम्प्लेक्स गाळया मध्ये मागील ३० वर्षापासुन स्वत:चे धनश्री मेडीकल स्टोअर्स नावाचे दुकान चालवित असुन फिर्यादीचे दुकानाला लागुनच राजु देशमुख रा .उमरेड यांचे किराणा दुकान असुन श्रीमती पुष्पा विजय खांदाडे यांचे दर्शन बुट हाउसचे दुकान आहे. फिर्यादीचे दुकानाचे बाजुला डॉ. विपुल गुप्ता यांचे पुनम मेडीकल नावाचे औषधीचे दुकान आहे. फिर्यादी रोज दुकानात येतो करीता नागपुर ते उमरेड येणे जाणे करीत असतो दिनांक १७/११/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वा. फिर्यादीने आपले दुकान उघडले होते व दिवसभर दुकानात हजर राहुन रात्री ०८.३० वा. दुकान बंद करून दुकानातील शटरला लोंखंडी कुलुप लावुन नागपुर येथे कारनी निघुन गेले. दिनांक १८/११/२०२३ रोजी सकाळी ०६/३० वा. सुमारास फिर्यादी आपले घरी नागपुर येथे हजर असता फिर्यादीचे ओळखीचे मित्र नामे —सचिन राजुरकर रा. नागपुर यांनी फिर्यादीला फोन करुन सांगीतले की, तुमचे दुकानाचे लोखंडी शटर उघडे असले बाबत उमरेड येथुन माहीती मिळाली. तुम्ही लवकर उमरेड ला जा असे सांगीतले वरुन फिर्यादी अंदाजे सकाळी ०८/३० वा. उमरेड येथे पोहोचले असता दुकाणाचे अर्धवट शटर वाकलेले दिसले यावरुन फिर्यादीचे दुकाणात चोरी झाले बाबत वाटलेवरून दुकाणाचे आत जावुन पाहीले असता माझे दुकानाचे आतमधील लाकडी ड्रॉवरचे गल्ल्यात ठेवलेले अंदाजे ३०००/— रु तसेच फिर्यादीने आजुबाजुला चौकशी केली असता दुकाणा शेजारी दुकाणदार नामे —राजु देशमुख यांचे सुद्धा किराणा दुकाणाचे लोखंडी शटर अर्धवट उघडे होते तेव्हा त्यांनी सुद्धा त्यांचे दुकाणात चोरीचा प्रयत्न झाल्याचे सांगुन दुकाणाचे लोखंडी शटरचे नुकसान केल्याचे सांगीतले. तसेच पुष्पा खांदाडे रा. उमरेड यांचे दर्शन बुट हॉउस दुकाणाचे सुद्धा लोखंडी शटर वाकवुन नुकसान करुन आत प्रवेश करुन नगदी १५००/— रु चोरी करुन नेल्याचे माहीती झाले तसेच फिर्यादीचे दुकाणाचे बाजुला असलेले डॉ. विपुल गुप्ता यांचे पुनम मेडीकल स्टोअर्सचे सुद्धा लोखंडी शटर वाकवुन चोरीचा प्रयत्न झाल्याचे माहीती पडले. तसेच दुधेकर अपार्टमेंट गिरडकर ले आउट मोहपा रोड उमरेड येथील पाटील बीअर्स शॉपी मालक रोशन पांडुरंग पाटील यांचे बीअर शॉपीचे लोखंडी शटर अर्धवट वाकवुन शॉप मध्ये प्रवेश करुन कॉउंटरमधील नगदी २५००/— रु. व १० टिनच्या बीअर कॅन प्रत्येकी १५०/— रु प्रमाणे १५००/— रु. चा माल तसेच बालाजी ट्रेडर्स किराणा दुकाणाचे लोखंडी शटर वाकवुन दुकाणाचे आत प्रवेश करुन कॉउंटर मधिल नगदी ३०००/— रु. व सिगारेट पॉकीट प्रत्येकी १५०/— रु प्रमाणे ९००/— रु. चा माल तसेच पिल्लेवान कॉम्प्लेक्स मधिल दोन दुकाणाचे लोखंटी शटर अर्धवट उघडुन तेथील चोरी करण्याचा प्रयत्न केला तसेच ईतवारीपेठ मेन रोड उमरेड येथील ईलेक्ट्रीक शॉप येथील दुकाणाचे लोखंडी शटर वाकवुन चोरीचा प्रयत्न केला आहे. दिनांक १८/११/२०२३ चे ०२/०० ते ०३/३० वा. सुमारास कोणीतरी अज्ञात चोरांनी फिर्यादीचे दुकाणाचे लोखंडी शटर अर्धवट उघडुन दुकाणाचे आत प्रवेश करुन कॉउंटर मधिल नगदी ३०००/ रु. तसेच ईतर दुकाणातुन नगदी ७०००/—

रु व सिगारेट व बियरकॅण किंमत २४००/– रु असा एकूण १२४००/ –रू चा मुद्देमाल चोरी केला आहे. काही दुकाणाचे लोखंडी शटर वाकवुन चोरी करण्याचा प्रयत्न केला असून दुकानाचे शटर वाकवून शटरचेसुद्धा नुकसान केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन उमरेड येथे अज्ञात आरोपींविरुध्द कलम ३८०, ४५७, ४२७, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि खोटेले ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत बावनगाव कोच्छी शिवार येथे दिनांक १६/११/२०२३ चे १२.०० वा. ते दिनांक १७/११/२०२३ चे ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– निलेश विठोबा चरडे, वय २८ वर्ष रा. खापा वार्ड क्र. ९ किल्लापुरा याचे शेतातील मकानातुन दोन मोठया बकऱ्या व तीन पिल्ले किंमती २०,०००/– रू, १ होंडा कंपनीचे पाण्याचे इंजन किंमती ५०००/– रू, १ लोखंडी गेट किंमती २५०० ठेसर मशीनचे दोन ग्रील किंमती ६०००/–रू., ट्रॅक्टरची अमरान कंपनीची बॅटरी, किंमती ४०००/–रू. तीन पितळी गुंड किंमती ३०००/– रू असा एकुण ४०,५००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक श्री. संतोष परतेकी हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०२ किमी अंतरावर मारोडी ता. मौदा येथे दिनांक १७/११/२०२३ चे ००.३० वा. ते दि. १७/११/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिनेश जयंतराव मस्के रा. मारोडी मौदा जि. नागपूर याने आपली ड्रिम युगा कंपनीची मोटरसायकल गाडी क्र. एम एच– ४०/ ए.ए– ८१८० किंमती अंदाजे २०,०००/–रू ही घरासमोर हॅन्डल लॉक करून ठेवली असता दिनांक १७/११/२०२३ सकाळी ०७.०० वा. दरम्यान पाहीली असता गाडी ही घरासमोर दिसुन आली नाही सदर गाडीचा घरासमोर तसेच गावात विचारपुस केली असता मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. असलम मो. नं. ८६६८८१६०४९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**